# श्रीरामकृष्ण परमहंस

(जीवन परिचय व सद्विचार)

शरद व. कुळकर्णी

रिया पब्लिकेशन्स्

**श्रीरामकृष्ण परमहंस** (जीवन परिचय व सद्विचार) **:**
**शरद व. कुळकर्णी**

© **शरद व. कुळकर्णी**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ओंकार ऑफसेट, कोल्हापूर.

**द्वितीय आवृत्ती**
मार्च, २०१२

**किंमत**
रुपये १९०/-

बाळकृष्ण रूपातील आमचा लाडका नातू

चि. आकाश (बाबू) यास

सप्रेम अर्पण !

**– शरद व. कुळकर्णी**

# मनोगत......

इंद्रधनुष्य हे ईश्वराचे प्रकट रूप असल्याचे मी मानतो. त्यामुळे माझी ईश्वरभक्तितील अभिरुची निदान सरासरी तरी गाठते. परंतु ज्यांनी आपले उभे जीवन ईश्वरभक्तीतच विलीन केले, त्यांचा व्यासंग किती थोर व ओजस्वी असेल बरे ! जगभरातील सर्वच संतविभूती आजही हे देवत्व घेऊनच पृथ्वीतलावर अवतरतात. म्हणूनच त्या सप्तरंगी भावरूपावरील माझी निष्ठा थोडी अधिक दृढ होते. त्या परमानंदाप्रीत्यर्थ, माझ्याही उत्कट विचारांनी यथासांग उमलण्याचा, प्रकटण्याचा योग मनोमन साधला तो हा असा.

श्रीरामकृष्ण परमहंस म्हणजे असाच एक सप्तरंगी, प्रेरणादायी आविष्कार. निरागस भक्ती हे त्यांच्या आचारविचारातील प्रमुख वैशिष्ट्य. प्रत्यक्ष ईश्वरदर्शनासाठी त्यांनी बालहट्ट धरला. पुढे त्यासाठी खडतर हालअपेष्टाही सोसल्याचे पाहून त्यांच्या निग्रही मनाचे भावचित्र डोळ्यांसमोर उभे रहाते. पैसा–संपत्तीलाच अस्पृष्य मानणारे श्रीरामकृष्ण वैचारिक सुखसमृद्धीचे एकनिष्ठ स्वामी होत. स्वपत्नीलाही त्यांनी कालीमातेचा अवतार व आपली आई समजून तिची अखंड पूजाअर्चना केली. यावरून त्यांच्या सच्छिलतेची कल्पना येते. आपल्या मनाला भावते ती त्यांची चिरविरक्ती व उच्चत्वाची ओढ. भगवंताने नेमून दिलेले सत्कार्य पूर्ण केल्याविना माघारी फिरणे नाही, ही त्यांची श्रद्धा सदा सतेज असे.

आम्ही त्यांचे समकालीन असतो तर? देवत्वाचा नाही, निदान दैवी प्रचितीचा तरी अष्टांग अनुभव पदरी पडला असता हे नक्की. सर्वधर्म समभावी असल्याचे सांगण्याअगोदर त्यांनी ख्रिश्चन तथा मुस्लीम संप्रदायातील तत्त्वप्रणालींचा सखोल अभ्यास केलेला आहे. आपल्या सत्वगुणात त्यांनी अखेरपर्यंत कठोर सातत्य राखले. संत परंपरेतील एक उत्तम परागकण असल्यानेच स्वामी विवेकानंदांनी त्यांना गुरुस्थानी मानले असावे. स्वत्वातील अद्वैत अर्थ श्रीरामकृष्णांना पूर्णपणे ज्ञात होता. अंत:प्रेरणाच मनुष्याच्या जीवनाला परिणामकारक गती देते असे ते मानीत असत. श्रीरामकृष्णांचा एकूण जीवनकाल पन्नास वर्षांचा. तोही विलक्षण अनासक्त व वैराग्यपूर्ण. त्यामुळे त्यांनी प्रचंच केला तो भक्तिसेवेचाच. वेद उपनिषदातील तत्त्वज्ञान त्यांचा आवडता विषय असे. त्याग, धर्म आणि आपल्या ध्येयाविषयी ते नेहमी सतर्क व जागरूक असत. ईश्वरदर्शन व लोककल्याण ही त्यांची वैयक्तिक उद्दिष्ट्ये होती.

परमेश्वर सर्व मनुष्यजिवात आहे परंतु सर्व मनुष्यजीव परमेश्वराच्या चरणी रूजू आहेत का? असा परखड प्रश्न उपस्थित करताना श्रीरामकृष्ण स्वत: सन्मती प्राप्त केल्याचा अप्रत्यक्ष निर्वाळा देतात. म्हणूनच अध्यात्मातील एक प्रज्ञावंत व सहिष्णुता लाभलेले थोर संत असेच त्यांचे वर्णन करणे योग्य होईल. मनात अढळ शुचिता राखून त्यांनी बारा वर्षे ध्यानधारणा केली. दीडशे वर्षापूर्वीचे हे तप तसे आधुनिक कालखंडातील भक्तिव्रत मानायला हवे. सर्वच मोहभेद करून श्रीरामकृष्णांनी सृजनशील भारतीय जनतेत स्वरूपाने आणखी एका गूढ व्यक्तिमत्त्वाची प्रतिमा निर्माण केल्याचे आपण पहातो. आध्यात्मिक दीपस्तंभ तर ते होतेच, शिवाय आपल्या अमोघ वाणी व कर्तृत्वातून त्यांनी लाखो लोकांच्या भविष्याची वाटचाल सुकर करून ठेवलेली आहे.

सर्व सृष्टीत ब्रह्म हेच 'एकम् अद्वितीयम्' असल्याचे त्यांनी मानले. ब्रह्माचे स्वरूप सत्य व वास्तविक असून तेच अंतिम असल्याची त्यांची मनोधारणा होती. 'एकम् अद्वितीयम्' म्हणजे अशी एक शक्ती, जिच्या भोवती अन्य काहीच नाही. या ब्रह्मशक्तीकडून मनुष्याच्या आत्म्याचे जेव्हा स्वागत होते, तेव्हा तो मनुष्य आत्म्यासह स्वर्गलोकी गेल्याचे श्रीरामकृष्ण मानतात. अखंड नामस्मरणातून निरंतर मुक्ती, म्हणजे जन्ममरणाचा फेरा चुकविण्याचे भाग्य लाभेल असेही सांगण्यात त्यांच्या अलौकिक आध्यात्मिक ज्ञानाचे कवडसे दृष्टीस पडतात. आचारविचारात विशुद्धता येण्यासाठी ईश्वरभक्ती व शक्ती कशी सहाय्यभूत ठरते हे श्रीरामकृष्णांनी अनेक ठिकाणी सोदाहरण दाखवून दिलेले आहे.

श्रीरामकृष्णांकडे प्रचंड मोठी निरीक्षण शक्ती आहे. समोर जे जे दिसते त्यात ईश्वरीय अर्थबोध भरभरून असल्याचे ते मानतात. त्यांचे सद्विचार कधी अवकाशात भ्रमण करतील, तर कधी समुद्र पाताळमार्गे थेट मनुष्यमनातही प्रवेशकर्ते होतील. कधी मोहक फुलांविषयी तर कधी हसऱ्या, चंचल फुलपाखरांचेही त्यांनी अवलोकन केले. अनेक प्रसंग, दृष्ये, स्वभाव, प्रपंच, ईश्वरशक्ति, निसर्ग, परिणाम, परिमाण, षड्रिपू व आनंद अशा नानाविध कानाकोपऱ्यातून विहार करीत या तत्त्वज्ञानीने सद्विचारांचे मोतीभांडार शोधून ते आपल्याला दान केले आहे. ते स्वीकारून, ते दान सत्पात्री असल्याचे आपले आपणच सिद्ध नको का करायला?

थोर ज्ञानी श्रीरामकृष्णांविषयी थोडेफार लिहिण्याचे भाग्य मला लाभले ही भगवंताचीच कृपा. त्याच अनुषंगाने अजब प्रकाशनचे सर्वेसर्वा श्री. शीतल मेहता व माझे मित्र श्री. रावजी देसाई यांचेही आभार मानणे उचित ठरते.

**– शरद व. कुळकर्णी**

**कथानुक्रम**


- श्रीरामकृष्ण परमहंस (भाग एक) ........९
- त्याग, वैराग्य व धर्म ........१९
- सिद्ध पुरुष, एक 'होम' पक्षी........३३
- अध्यात्म व आत्मनिर्भरता........४६
- भगवंताचे स्मरण ........५८
- शुचिर्भुत मन व मायाजाल ........६८
- गुरू ........७७
- फलोधारणा–ईश्वरशक्ती ........९०
- प्रार्थना व चिंतन ........१०२
- भक्तिसातत्य ........११३
- आत्मज्ञान व आनंद ........१२६
- सुगंध फुलांचा, सुगंध आत्म्याचा ........१३६
- गुरुमंत्र व चिंतन ........१४६
- श्रीरामकृष्ण परमहंस (भाग दोन) ........१५८
- भक्ती आणि प्रपंच ........१७१
- श्रीरामकृष्ण परमहंस (भाग तीन) ........१८३

# श्रीरामकृष्ण परमहंस (भाग एक)

बाल्यावस्थेत असतानाच श्रीरामकृष्णांना मानवता, धर्म व साधुसंतांविषयी नितांत आदर असे. निसर्ग व ईश्वरभक्तिचे गूढ त्यांना सतत अध्यात्माकडे प्रेरित करायचे. स्वत: या अद्‌भुत विश्वाचा विश्वासार्ह घटक असल्याचा सार्थ अभिमान त्यानी आयुष्यभर मनात ठेवला. श्रीरामकृष्णांकडे पुस्तकी शिक्षणाचा अभाव, परंतु श्रद्धा, भक्ती, दूरदृष्टी व ध्येयवादाचे अफाट भांडार नक्कीच होते. सृष्टीतील प्रत्येक वस्तुविषय एकाच केंद्राभोवती निगडित असून, ते शुभकेंद्र म्हणजे ईश्वरभक्ती. मानववंशासाठी हेच जीवनमूल्य साधक व तारकही असल्याची त्यांची मनोधारणा, त्यांच्या दिव्य सत्वाची प्रचिती देते. श्रीरामकृष्ण विशुद्ध आत्मसेवक होते. ऐहिक सुखाच्या कल्पनेतही न रमणारे सच्छिल गदाधर, गुरुविद्या, गुरुज्ञान श्रेष्ठ मानीत असत. त्यांच्या विचारात अगम्य निरागसता आढळते. राग, लोभ या अत्यंत तुच्छ अवगुणांशी श्रीरामकृष्णांनी दुराग्रह ठेवला तो अखेरपर्यंत. समाधी, चिंतन, मनन हे त्यांचे आवडते विषय. अद्वैतभाव तर त्यांचा वैयक्तिक स्थायिभाव होता. हिंदू धर्म व संस्कृतीसह श्रीरामकृष्णांनी इस्लाम, ख्रिश्चन धर्मतत्त्वांचाही अभ्यास केला. सर्वधर्म समभाव हे वचन त्यांनी आयुष्यभर पाळले.

मनुष्यमनात देवत्त्वाचा कणभर तरी अंश आहेच आहे, ही उत्स्फूर्त संकल्पना श्रीरामकृष्णांनी आपल्या विचारांतून सतत मांडली. सद्य जीवनशैली व मनुष्याचे गुणावलोकन करून त्यांनी एकच निष्कर्ष काढलेला आहे तो म्हणजे या पृथ्वीतलावर निखळ उत्क्रांतीसाठी मनुष्याला खरी गरज आहे ती फक्त ईश्वरसेवेची. 'बोले तैसा चाले' या वचनाप्रमाणे त्यांचे विचार कृतीनिष्ठ असत. मानववंशाला लाभलेल्या बौद्धिक देणगीचा त्याच्याकडून कितपत उचित सदुपयोग होतो, याचा वेध घेणे त्यांना आवडे. नास्तिक लोकांविषयी त्यांना अधिक आस्था असे. कारण त्यांचे मनोपरिवर्तन करणे हे ईश्वरिय व्रत असल्याचे ते मानत. ज्ञानसाधनेत परिसीमा नसते. म्हणून जिथे जिथे अज्ञान आहे ते समूळ नष्ट करणे, हा सेवापरायणाचाच प्रथम स्वाध्याय असल्याचे ते सांगतात. श्रीरामकृष्ण म्हणतात, मनात ईश्वरसाक्ष भक्तीच नसेल तर संपूर्ण जीवनाचा ताळेबंदच चुकीचा होतो. तसेच अज्ञानामुळे भक्तिभावनांचा झालेला विपर्यास भगवंताला रुचेल का, असाही भावूक प्रश्न ते आपल्याला विचारतात.

श्रीरामकृष्णांना विश्वातून असंख्य लहानमोठे संकेत मिळत असत. परंतु तेवढ्यानेच त्यांचे समाधान झाले असते तर संतांच्या पंक्तीत त्यांची गणना झालीच नसती. विलक्षण कर्तृत्वप्रिय असे त्यांचे मन, पूर्णत्व व ईश्वरिय साक्षात्काराच्या प्राप्त्यर्थ हरखून गेलेले असायचे. वेगवेगळ्या रुपातील ईश्वर पहाण्याची त्यांची इच्छा, मनस्वी व अनिवार्य होती एवढे नक्की. पुरी बारा वर्षे त्यांनी ईश्वरभेटीसाठी तपश्चर्या केली. तहान, भूक व झोपेचाही विसर होऊन श्रीरामकृष्णांचे सारे आयुष्यच पालटून गेले. तासन् तास शून्यत्वाचा वेध घेतला. उन्हापावसातही हालअपेष्टांना आपलेसे केले. नित्यनेमपूर्वक नामस्मरण झाले, नामोच्चाराने कंठशोष झाला. उपासतापासही घडले, लोकांनी वेड्यात काढले तरीही निष्ठुर देवाला दया आली नाही. मोठ्या विकलांग अवस्थेत असताना, देवी कालीमातेनेच दृष्टांत दिला, 'जोवर तुझ्या मनात शरिरधारणा जिवंत आहे व जोवर तू मीपण विसरत नाहीस तोवर तुला उच्चत्वातील सत्य जे परमेश्वर ते दिसणे, समजणे, स्पर्शणे केवळ अशक्य.'

धर्मज्ञानाचा तो तेज:पुंज रामबाण श्रीरामकृष्णांच्या अंत:करणापर्यंत जाऊन



भिडला. अस्वस्थ असे ते तपस्वी, क्षणभर सैरभैर होऊन लगेचच सावरले. श्रीरामकृष्णांची खरी भक्तिमाया सुरु झाली ती इथूनच. त्यांच्या एका हातात राणीछाप रुपया व दुसऱ्या हातात कचरा होता, तेव्हा लागलीच आत्म्याने त्यांना बजावले, 'भक्तियोगात या दोन्ही गोष्टी एकसारख्या, अर्थशून्य व विनामोल आहेत. सृष्टीत जे देदीप्यमान व दैवी आहे ते सहजासहजी दिसेलच कसे? त्या शक्तीची प्रचिती व प्रत्यंतर म्हणजे ईश्वर सान्निध्य, हे तू लक्षात घे.' तद्नंतर काही दिवसांनी एकदा मथुरानाथ नामक एका सद्गृहस्थानी श्रीरामकृष्णांच्या अंगाखांद्यावर एक शाल पांघरली. शाल अंदाजे पंधराशे रुपयांची, सोन्याच्या काठांनी मढवलेली. फक्त एकच घटका, एक घटका श्रीरामकृष्णांना त्या भरजरी शालीचा मोह झाला असावा तोच त्यांनी ती शाल खांद्यावरून फर्रकन खाली ओढली, पायाखाली तुडविली व त्यावर ते तुच्छतेने थुंकलेही. म्हणाले, 'अशा मोहक वस्तूच मनात वृथा पोकळ गर्व निर्माण करीत असतात, मन विचलित होते. एका कणाचाही आनंद व ज्ञान या शालीतून मिळणे असंभव. माझ्या दृष्टीने ही टाकाऊ वस्तू असून चिंध्यांपेक्षाही ती कवडीमोल आहे.'

संतवाणीतून प्रकटणारे तत्वचिंतन प्रत्यक्षात भगवंताचेच विचार असतात. त्यातील अवीट गोडीची मनुष्याच्या मनाला, कर्णेंद्रियाना सवय होते. हृदयात भक्तीचा छंद अधिक व्यापक होऊन, प्रपंचाचा सोस नावालाही शिल्लक उरत नाही हे सत्य आहे. श्रीरामकृष्ण म्हणतात, देव बोलतात ते ऐकत असताना मनाला वैदिक विचारांचाच अधिक पुरवठा होतो, हे माझ्याप्रमाणे अनेकांनी अनुभवले असेल. मनुष्याच्या विचारपद्धतीवर नियंत्रण ठेवणारे हे वास्तववादी बोल, त्याच्या आचारातही अमोघ आदर्श निर्माण करतात पहा. म्हणून संतांचे प्रवचन ऐकायला मिळणे हे एक दैवी भाग्यच म्हणायला हवे. ज्यांची घरेदारे तीर्थक्षेत्रांच्या शेजारीच वसलेली आहेत. ते लोक किती सुदैवी व दूरदर्शी असावेत बरे ! अनेक जन्मांतरानंतर, संतवाणी व संतसान्निध्य लाभल्याचे रोजचे पुण्य खरोखर अवर्णनीय असावे. सर्व लोभ व इच्छासक्तींचा समूळ नाश होतो तो याच अनुशील वातावरणात. संतवाणीत दया, क्षमा व शांतीचे भरभरून सांगणे आहे. 'संत' या शब्दोच्चारानेच भक्ताना देवत्वाचा भास होत असावा. कारण, सत्ता व संपत्तीपेक्षा लाख मोलाची गुणसूत्रे या शब्दात